डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## परिसर विकास अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव

# परिपत्रक

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या औद्योगिक फळबागेतील वृत्तपत्र विभागामागील व विद्यापीठ उद्यान कार्यालयाजवळील चिंच झाडांच्या फळांचा जाहीर लिलाव आहे त्या स्थितीत करण्याचे निश्चित केले आहे. हा जाहीर लिलाव मा. अध्यक्ष- परिसर विकास समिती, संचालक- विद्यार्थी कल्याण, वित्त व लेखाअधिकारी, कार्यकारी अभियंता- स्थावर विभाग (सचिव-परिसर विकास समिती), अंतर्गत लेखापरीक्षक, उद्यान अधिक्षक व उद्यानविद्यावेत्ता यांच्या उपस्थितीत केला जाईल.

हा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक 10-01-2012 रोजी दु. 12.30 वा. विद्यापीठ उद्यान विभाग येथे होणार आहे.

तरी ज्यांना सदरील जाहीर लिलावात बोली बोलावयाची असेल त्यांनी लिलावापूर्वी अनामत रक्कम रू. 500/- (अक्षरी- पाचशे रु. फक्त) लेखा विभागाकडे रोखीने भरून ती पावती विद्यापीठ उद्यान विभागात दाखवावी. पावती दाखविल्याशिवाय लिलावात सहभागी होता येणार नाही.

जाहीर लिलावातील अटी व नियम सोबत जोडले आहेत.

संदर्भ क्र. विद्यापीठ उद्यान/चिंच लिलाव/2011/495-577
दि. 05-01-2012

मा. कुलसचिव

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# परिसर विकास अंतर्गत असणाऱ्या चिंच फळांचा जाहीर लिलाव

## लिलावाच्या अटी व नियम खालीलप्रमाणे आहेत

1. विद्यापीठ परिसरातील चिंचाच्या जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रू. 500/- लेखा विभागात भरावी लागेल.
2. महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.
3. भरलेल्या अनामत रक्कमेची पावती दाखविल्याशिवाय बोली बोलता येणार नाही व लिलावात भाग घेता येणार नाही.
4. लिलावास प्रारंभ करताना कमीत कमी रू. 1000/- पासून बोलीस प्रारंभ करावा ही बोली रू. 500/- पटीत असावी.
5. जाहीर लिलावात ज्यांची बोली मान्य होईल त्यांना फळझाडांची देखभाल व संरक्षण स्वत: करावे लागेल. याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.
6. जाहीर लिलावातील बोलीची पूर्ण रक्कम लेखा विभागाकडे जमा करावी लागेल. त्यानंतरच फळझाडांचा ताबा देण्यात येईल.
7. घेतलेल्या फळझाडांची सुरक्षा ठेव म्हणून जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी भरण्यात आलेल्या रक्कमे व्यतिरिक्त रू. 1000/- अगोदर भरावे लागेल, झाडांना इजा पोहचल्यास सुरक्षा रक्कम कपात केली जाईल.
8. माल संपल्यानंतर भरलेले 500 + 1000 = 1500/- रू. उद्यान अधिक्षक, विद्यापीठ उद्यान यांचा अभिप्राय मिळाल्याशिवाय पैसे परत मिळणार नाही. तसेच शेतीमध्ये इतर पीके घेता येणार नाहीत. पीके घेतल्यास मा. कुलसचिवांच्या आदेशानुसार कार्यवाही केली जाईल.
9. प्रथम क्रमांक बोली धारकाने निर्धारित वेळेत लिलावात निश्चित झालेली रक्कम न भरल्यास प्रथम क्रमांक बोली धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
10. ज्यांनी लिलाव घेतला त्यांचा कालावधी हा लिलाव घेतलेल्या कालावधी पासून मालाचा उठाव करेपर्यंत किंवा एप्रिल 2012 पर्यंत राहील अथवा सद्याचा एकच फळ बहार राहील, ही अट बंधनकारक असेल.
11. लिलावातील बोलीची अपेक्षित किंमत न मिळाल्यास ती मान्य अथवा अमान्य करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.